# मल्हारपेठ पोलीस ठाणे जि.सातारा
**फोन नं-०२३७२/२९९२३३ पिन नं.४१५२०५**
**ईमेल-malhapethps.satara@mahapolice.gov.in**


## प्रेसनोट ता.२९/१२/२०२५

**३१ डिसेंबर अनुषंगाने मल्हारपेठ पोलीसांकडून बेकायदा बिगरपरवाना चोरटी दारू विक्रीवर कारवाई.**

दि.२९/१२/२०२५ रोजी चेतन मछले, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे सोनाईचीवाडी ता.पाटण ता. जि. सातारा गावचे हद्दीत मारूल ओढा येथे झुडपाच्या आडोशाला इसम नामे उत्तम चंद्रु काजारी रा.काजारवाडी, खळे ता.पाटण जि.सातारा हा बेकायदा बिगर परवाना विदेशी दारुची चोरटी विक्री करीत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सपोनि मछले सो, यांनी सदर ठिकाणी छापा टाकणेकरिता श्रेणी पोउनि / घाडगे, सफौ / अंकुशी, पो.हवा.बं.नं. ७९९ लेंभे, पोडवा /३६३ पाटील, पोकॉ./३१४ नेहरकर असे खाजगी वाहनाने मारुल ओढ्याच्या अलिकडे खाजगी वाहन अलीकडे उभे करुन तेथून पायी चालत मिळाले बातमीचे ठिकाणी दुपारी १३.०० वा. चे सुमारास अचानक छापा टाकला असता तेथे एक इसम आपल्या पुढ्यात खाकी पुष्ट्याचे बॉक्स घेवुन बसलेला दिसला. त्याला पो.कॉ.नेहरकर व पोहवा / ३६३ पाटील यांनी जागेवर थांबविले. व त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव उत्तम चंद्रु काजारी वय. ६३ वर्षे रा. काजारवाडी, खळे ता.पाटण जि.सातारा असे सांगितले. त्याचे कडील खाकी पुष्ट्याचे बॉक्स तपासले असता त्यामध्ये प्रोव्ही माल मिळून आला. त्या प्रोव्ही मालाचे वर्णन खालील प्रमाणे.

१) १८००.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये MASTERS DELIGHT WHISKY असे लिहीलेले लाल रंगाचे लेबल असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी १५० रुपये किंमतीच्या एकूण १२ सिलबंद प्लास्टिकच्या बाटल्या.
२) ३०००.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये ROYAL CHALLENGE असे लिहीलेले लाल रंगाचे लेबल असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी २५० रुपये किंमतीच्या एकूण १२ सिलबंद लाल रंगाच्या प्लास्टीकच्या बाटल्या.
३) १३२०.००/- खाकी पुष्थाचे बॉक्समध्ये MANGO VODKA असे लिहीलेले हिरवट रंगाचे लेबल असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी २२० रुपये किंमतीच्या एकूण ६ सिलबंद काचेच्या बाटल्या.
४) १३२०.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये CRANBERRY VODKA असे लिहीलेले गुलाबी रंगाचे लेबल असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी २२० रुपये किंमतीच्या एकूण ६ सिलबंद काचेच्या बाटल्या.
५) १३२०.००/- खाकी पुष्ट्धाचे बॉक्समध्ये GRAND MASTERS MANGO असे लिहीलेले निळे, पिवळे, लाल रंगाचे पट्टे असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी २२० रुपये किंमतीच्या एकूण ६ सिलबंद काचेच्या बाटल्या.
६) १८००.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये GRAND MASTERS CRANBERRY असे लिहीलेले निळे, पिवळे, लाल रंगाचे पट्टे असलेल्या १८० मिली च्या प्रत्येकी ३०० रुपये किंमतीच्या एकूण ६ सिलबंद काचेच्या बाटल्या.
७) १०८०.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये IMPERIAL BLUE असे लिहीलेले निळे रंगाचे लेबल असलेल्या ९० मिली च्या प्रत्येकी ९० रुपये किंमतीच्या एकूण १२ सिलबंद काचेच्या बाटल्या.
८) १९२०.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये MASTERS DELIGHT WHISKY असे लिहीलेले लाल रंगाचे लेबल असलेल्या ९० मिली च्या प्रत्येकी ८० रुपये किंमतीच्या एकूण २४ सिलबंद प्लास्टिकच्या बाटल्या.
९) २५२०.००/- खाकी पुष्ट्याचे बॉक्समध्ये ROYAL STAG असे लिहीलेले पांढरे रंगाचे लेबल असलेल्या ९० मिली च्या प्रत्येकी १४० रुपये किंमतीच्या एकूण १८ सिलबंद काचेच्या बाटल्या.
एकुण १६०८०.००/- रूपये.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा व किंमतीचा प्रोव्हीशन माल उत्तम चंद्रु काजारी वय. ६३ वर्षे रा. काजारवाडी, खळे ता.पाटण जि.सातारा याने बेकायदा बिगर परवाना स्वतः चे फायद्याकरीता १६०८०/- रुपये किमतीचा प्रोव्हीशन माल चोरटी विक्री करणेच्या उद्देशाने त्याचे कब्जात मिळून आलेला आहे.

सदरची कारवाई मा.तुषार दोषी पोलीस अधीक्षक सातारा, मा.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा, मा.अतुल सबनीस पोलीस उपअधीक्षक सातारा, मा.विजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग पाटण यांचे मार्गदर्शनाखाली चेतन मछले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्रेणी पोउनि बाजीराव घाडगे, सफौ. राजेंद्र अंकुशी, पो.हवा.संतोष लेंभे, पो.हवा.सचिन पाटील, पो.कॉ.अविनाश नेहरकर यांनी केली आहे.
आरोपीचे नाव - उत्तम चंद्रु काजारी वय. ६३ वर्षे रा. काजारवाडी, खळे ता.पाटण जि.सातारा

प्रति,
मा.संपादक,
दै.------------------------

**चेतन मछले**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक**
**मल्हारपेठ पोलीस ठाणे**

**२/-** सदरची बातमी आपले लोकप्रिय दैनिकातुन प्रसिध्द होणेस विनंती आहे.